MHLA140022122023

## निशाणी क्र. ०५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र. १ ते ४ विरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश देण्यासाठी दाखल केला आहे. वादीने अर्जासोबत शपथपत्र सादर केले आहे. वादीने मुळ दावा कायमचा मनाई हुकूम मिळण्याकामी दाखल केलेला आहे.

(२). **वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः**

मौजे याकतपूर ता. औसा जि.लातूर येथील गट नं.७७३ मधील क्षेत्र ० हे. ८१ आर (चतुःसीमा प्रस्तुत अर्ज परिच्छेद क्र.३ मध्ये सविस्तर दिलेल्या आहेत.) हा दाव्याचा वाद विषय आहे. (यापुढे 'दावा मिळकत' असा उल्लेख) वादीने कथन केले आहे की, दावा मिळकतीचा मुळ मालक भगवान केरबा गवळी हा होता. वादीस सदर दावा मिळकत विकेपर्यंत तो ८१ आर जमीनीचा मालक व कब्जेदार होता. सदर जमीन वादीने खरेदीखत क्र. १६१६/२००७ दिनांक २३.०५.२००७ अन्वये खरेदी केली व तेव्हापासून त्याचे नाव ७/१२ उता–यावर असून तो दावा मिळकतीचा मालक व कब्जेदार म्हणून आजपर्यंत काबीज आहे. प्रतिवादींनी आपसात संगणमत करुन दावा मिळकतीच्या पश्चिम बाजूने थोडा थोडा बांध टोकरुन वादीच्या मिळकतीवर अतिक्रमण केले आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादीस जमीनीची मोजणी करुन घेण्याची विनंती केली असता प्रतिवादींनी त्यास नकार दिला व वादीस जमीनीत येण्यापासून हरकत अडथळा करु लागले. वादीने दावा मिळकतीमध्ये दिनांक ३०.०६.२०२३ रोजी पेरणीसाठी गेला असता त्यास प्रतिवादींनी रोखले व पेरणी करणारेस जीवे मारण्याची धमकी दिली. प्रतिवादींचा दावा मिळकतीशी कसल्याही प्रकारचा हक्क संबंध नसताना प्रतिवादी हे वादीस वाद मिळकतीमध्ये पेरणी, मेहनत मशागतीच्या कामामध्ये

रोखठोक व अडथळा करीत आहेत. सबब वादीने दावा दाखल करुन प्रस्तुत अर्जाद्वारे तुर्तातुर्त मनाई हुकुमाची मागणी केली आहे.

(३). वादीतर्फे विधिज्ञ श्री.एस.टी.शिंदे यांचा युक्तीवाद ऐकला. वादपत्र व प्रस्तुत अर्ज वाचला. वादीने कागदपत्राच्या यादी सोबत दाखल केलेले दस्ताऐवजाचे अवलोकन केले.

(४). वादी हा दावामिळकतीचा नोंदणीकृत खरेदीखताद्वारे मालक असल्याचे अभिलेखावरुन प्रथमदर्शनी दिसते. वादीचा दावा मिळकतीवर आणि ताबा प्रथमदर्शनी दिसतो. वादी दावा मिळकतीच्या कब्जेवहिवाटीत आहे असे प्रथमदर्शनी अभिलेखावरुन दिसते. सध्या पेरणीचा हंगाम लक्षात घेता अर्ज मंजूर करणे आवश्यक ठरते. म्हणुन दाव्याचे स्वरुप लक्षात घेता दावामिळकतीचे संरक्षण होणे आवश्यक आहे. प्रथमदर्शनी प्रतिवादीविरुध्द एकतर्फा मनाई आदेश न दिल्यास वादीने दावा दाखल करण्याचा हेतू असफल होईल. म्हणुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करणे न्यायाचे होईल.

## आदेश

१. प्रतिवादी क्र. १ ते ४ अथवा त्यांचे मार्फत इतरांनी मौजे याकतपूर ता.औसा जि.लातूर येथील वादीच्या मालकीच्या गट क्र. ७७३ मधील ८१ आर मिळकतीवर (ज्याची चतुःसीमा प्रस्तुत अर्जाच्या परिच्छेद क्र. २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे) वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा तुर्तातुर्त एकतर्फा मनाई आदेश **दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ चा आदेश ३९ नियम ३ च्या परंतुकानुसार** पुढील तारखेपर्यंत देण्यात येतो.

२. एकतर्फा तात्पुरता मनाई आदेश पुढे दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत कायम का करण्यात येऊ नये याचे कारण दाखविण्यासाठी प्रतिवादींना नोटीस काढण्यात यावी.

३. वादीने स्पेशल बेलीफ भत्ता व व अतिशिघ्र आदेशिका भरावी.

४. वादीने **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ आदेश ३९ नियम ३(अ)** नुसार प्रतिवादींना मनाई आदेशाची प्रत, सोबतचे शपथपत्र, वादपत्र आणि वादपत्रासोबतचे दस्तऐवज नोंदणीकृत पोष्टाने पाठवावीत. वादीने सदर पुर्तता केल्याबाबत उद्यापर्यंत शपथपत्र सादर करावे.

५. वादीने **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ आदेश ३९ नियम ३ (अ)** ची पुर्तता केल्यावर वादीला एकतर्फा मनाई आदेशाचा अनुज्ञालेख (writ) द्यावा.

६. प्रस्तुत आदेशाने जर प्रतिवादी व्यथित झाले असतील तर ते प्रस्तुत आदेश रद्द करण्यासाठी किंवा आदेशात फेरबदल करण्यासाठी नेमलेल्या तारखेपुर्वी न्यायालयात हजर राहून अर्ज करु शकतात. जर प्रतिवादींनी नेमलेल्या तारखेपुर्वी आदेश रद्द करण्यासाठी किंवा आदेशात फेरबदल करण्यासाठी अर्ज करावयाचा असल्यास त्यांनी तो न्यायालयात हजर राहून अर्ज दाखल करण्याची तारीख व वेळ वादीला किंवा त्यांच्या विधिज्ञांना रीतसर नोंदणीकृत पोष्टाने, जातीने समक्ष अथवा अन्य मार्गाने कळवून तसा कळवल्याचा पुरावा दाखल करावा.

७. पुढील नेमलेली तारीख १०/०८/२०२३

(खुल्या न्यायालयात जाहीर व अधिघोषित)

Digitally signed by KOLEKAR PRASAD DIPAK
Date: 2023.07.18 17:15:51 +0530

दिनांकः– १८/०७/२०२३ (पी.डी.कोळेकर)

औसा. २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, औसा.